महाराष्ट्र संसर्गजन्य आजार प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समिती गठीत करण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

## शासन निर्णय क्रमांकः साथरोग २०१५/समिती/प्र.क्र.१३३/आ-५

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
१० वा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: ०७ एप्रिल, २०१५

वाचा -

संआसे/संचा.कक्ष/मसआप्रनि/समिती/२९६६/२०१५, दि.१७/०३/२०१५

प्रस्तावना -

महाराष्ट्राची लोकसंख्या ११ कोटीहून अधिक आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक शहरीकरण ( ४५ %) झालेले राज्य आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिक विकास, सुमारे १०%च्या आसपास असणारी आदिवासी लोकसंख्या आणि ७२० कि.मी.चा समुद्र किनारा या सामाजिक आणि भौगोलिक कारणांमुळे राज्यात विविध प्रकारच्या साथरोगांचा प्रादुर्भाव होताना दिसून येतो. ठाणे,नाशिक, नंदुरबार तसेच पुर्व विदर्भातील गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर या आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये हिवतापाची समस्या प्रामुख्याने आढळून येते. सिंधूदुर्ग, रायगड, रत्नागिरी, ठाणे,मुंबई या समुद्र किनाऱ्यालगतच्या प्रदेशात लेप्टोस्पायरोसिस या आजाराची समस्या मुख्यत्वे आढळून येते. विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये चंडीपुरा, मेंदूज्वर तसेच जपानी मेंदूज्वराचे रुग्ण मान्सून कालावधीत आढळतात. मागील ३ वर्षापासून राज्यातील शहरी तसेच निमशहरी भागामध्ये डेंग्यू या किटकजन्य आजाराचा प्रादुर्भाव दिसून येत आहे, सन २००९-१० तसेच या वर्षी राज्यात मोठया प्रमाणात स्वाईन फ्ल्यू या आजाराचे रुग्ण आढळले आहेत. नव्याने उद्भवणारे इबोला सारखे आजार तसेच पुन्हा डोके वर काढणारे डेंग्यू, स्वाईन फ्ल्यू, हिवताप, लेप्टोस्पायरोसिस या सारखे जुने आजार यावर प्रभावी नियंत्रण करणे हे महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेसमोरील नेहमीचे आव्हान आहे. याकरिता राज्यात सध्या आढळणारे स्वाईन फ्ल्यू आणि तत्सम आजारांवर प्रभावी प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजना राबविण्यासाठी एका उच्चस्तरीय तांत्रिक समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

महाराष्ट्रात संसर्गजन्य आजारांबाबत अभ्यास करुन प्रभावी प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजना राबविण्यासाठी "महाराष्ट्र संसर्गजन्य आजार प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समिती (Maharashtra Communicable Diseases Prevention & Control Technical Committee)" खालीलप्रमाणे उच्चस्तरिय समिती गठित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ.सुभाष साळूंखे (निवृत्त महासंचालक) | अध्यक्ष |
| २ | संचालक,आरोग्य सेवा (महाराष्ट्र), मुंबई | सदस्य |
| ३ | संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र | सदस्य |
| ४ | संचालक, हाफकिन संशोधन व शिक्षण संस्था, मुंबई | सदस्य |
| ५ | तज्ञ प्रतिनिधी, राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था पुणे | सदस्य |
| ६ | तज्ञ प्रतिनिधी, राष्ट्रीय संसर्गजन्य आजार नियंत्रण केंद्र (एन.सी.डी.सी.) नवी दिल्ली. | सदस्य |
| ७ | डॉ.दिलिप कदम, विभाग प्रमुख, मेडिसीन विभाग, बी.जे.मेडिकल वैद्यकिय महाविद्यालय, पुणे | सदस्य |
| ८ | डॉ.किणीकर, विभाग प्रमुख, बालरोग विभाग, बी.जे.मेडिकल वैद्यकिय महाविद्यालय, पुणे. | सदस्य |
| ९ | आरोग्य अधिकरी, मनपा मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद,नाशिकं. | सदस्य |
| १० | अध्यक्ष, इंडियन मेडीकल असोसिएशन, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ११ | अध्यक्ष, इंडियन पेडीयाट्रिक असोसिएशन, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| १२ | सहसंचालक, आरोग्य सेवा (हि.ह.व ज.रो.) पुणे | सदस्य सचिव |

### समितीची उध्दिष्टे : -

१) महाराष्ट्रातील साथरोग परिस्थितीचा जिल्हानिहाय अभ्यास करणे.
२) राज्यातील साथरोग परिस्थितीचे विश्लेषण करुन साथरोग उद्भवाची कारणमीमांसा तसेच करावयाच्या प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजनांची रुपरेषा सादर करणे.
३) राज्यातील सध्याच्या साथरोग नियंत्रण व्यवस्थेचा अभ्यास करुन त्यात आवश्यक बदल सुचविणे
४) साथरोग परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी गरज भासेल तेव्हा क्षेत्रिय भेटी देणे.
५) महाराष्ट्राच्या शेजारील राज्यांमधील साथरोग परिस्थितीचा तुलनात्मक अभ्यास करुन त्याअनुषंगाने आंतरराज्य समन्वयाचे मुद्दे निश्चितकरणे.

६) साथरोग नियंत्रणसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता, नगरविकास, कृषि व पशुसंवर्धन या विभागाशी प्रस्थापित करावयाच्या समन्वयाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करणे.

सदर समितीने सद्या राज्यात स्वाईन फ्ल्यू समस्या असल्याने प्राथम्याने स्वाईन फ्ल्य प्रतिबंध आणि नियंत्रणासंदर्भात काम करण्यास सुरुवात करावी आणि समितीच्या स्थापनेपासून दोन महिन्याच्या कालावधीत आपला अहवाल शासनास सादर करावा. भविष्यात संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव आढळून आल्यास सदर समितीची बैठक आयोजित करुन ही समिती संसर्गजन्य आजारावर प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजना सुचविल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०४०७१००४५९६८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dnyandeo Laxman Sul

Digitally signed by Dnyandeo Laxman Sul
DN: CN = Dnyandeo Laxman Sul, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.04.07 10:37:17 +05'30'

**(ज्ञा. ल. सुळ)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
२. संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र
३. संचालक, हाफकिन संशोधन व शिक्षण संस्था, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे स्वीय सहायक
५. मा.मंत्री (आरोग्य) यांचे स्वीय सहायक
६. मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांचे स्वीय सहायक
७. डॉ. सुभाष साळुंखे, सेवानिवृत्त आरोग्य महासंचालक.
८. तज्ञ प्रतिनिधी, राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था पुणे
९. तज्ञ प्रतिनिधी, राष्ट्रीय संसर्गजन्य आजार नियंत्रण केंद्र (एन.सी.डी.सी.) नवी दिल्ली.
१०. डॉ.दिलिप कदम, विभाग प्रमुख, मेडिसीन विभाग, बी.जे.मेडिकल वैद्यकिय महाविद्यालय, पुणे

११.डॉ.किणीकर, विभाग प्रमुख, बालरोग विभाग, बी.जे.मेडिकल वैद्यकिय महाविद्यालय, पुणे.

१२.आरोग्य अधिकरी, मनपा मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद,नाशिक.

१३.अध्यक्ष, इंडियन मेडीकल असोसिएशन, महाराष्ट्र राज्य

१४.अध्यक्ष, इंडियन पेडीयाट्रिक असोसिएशन, महाराष्ट्र राज्य

१५.सहसंचालक, आरोग्य सेवा (हि.ह.व ज.रो.) पुणे

१६.निवडनस्ती (आरोग्य -५)